Golden Research Thoughts
Vol -2 , ISSUE –8, Feb.2013
ISSN:- 2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

करवीर संस्थानाचे कृषिविषयक धोरण - एक अभ्यास
(1870 - 1900)

वंदना रामचंद्र लोंढे

मालती वसंतदादा पाटील कन्या
महाविद्यालय,इस्लामपूर,ता.वाळवा,
जि. सांगली (महा.)

प्रस्तावना :

भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारतात प्राचीन काळापासून शेतीला खूप महत्व आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय समाजात सर्वात जास्त लोकांचा उदरनिर्वाह शेतीवरच चालत असे. तसेच कोल्हापूर राज्यातही जास्तीत-जास्त लोक शेतीवरच अवलूबून होते. दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापूर हे सर्वात मोठे संस्थान होते. याला ' दक्षिण काशी ' म्हणूनही ओळखले जात होते. करवीर संस्थान हे महाराष्ट्राच्या नैऋत्येकडे असून या संस्थानची सीमा पूर्वेस कृष्णा नदी आणि बेळगाव जिल्हा पश्चिमेस सहयाद्री पर्वतरांगा दक्षिणेस बेळगाव आणि उत्तरेस वारणा नदी आहे. करवीर संस्थानाच्या पूर्वबाजूस सपाट मैदानाची शेतजमीन आहे. येथील लोकांची शेतीची लागवड करण्याची पध्दत फार साधी व सोपी होती. करवीर राज्यात काळी, तांबडी , मळी आणि खारी किंवा पांढरी अशा चार प्रकारची जमीन होती. या जमिनीत वेगवेगळी पिके घेतले जात होती. यातूनच येथील लोक आपला उदरनिर्वाह करीत असत. शेतकऱ्यांना येणाऱ्या समस्या, व त्यावर येथील छत्रपतीने नेमके कसे उपाययोजना राबविल्या यावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यांत आलेला आहे.

1) जमिनीचे वर्गीकरण :-

कोल्हापूर राज्यातील जमिनीचे वर्गीकरण तिच्या उत्पादन क्षमतेवर व रंगावर केले होते. कोल्हापूर राज्यात काळी, तांबडी, मळी आणि खारी किंवा पांढरी अशा चार प्रकारची उत्तम, मध्यम, हलकी जमीन होती. यामध्ये काळी व तांबडी जमीन उत्तम प्रकारची मानली जात होती. ती सहयाद्रीच्या उत्तरणीवर होती. काळी जमीन नद्यांच्या खोऱ्यात होती. या जमीनीतून वर्षातून दोन किंवा तीन पिके घेतली जात होती. डोंगराळ जमीन बरीच वर्षे पड टाकून त्यात लागवड केली जात होती. कोल्हापूर संस्थानामध्ये पश्चिमेकडील डोंगराळ भागात पडीक जमीन फार मोठया प्रमाणावर होती. ही जमीन उत्पादनाकरिता कमी प्रतीची मानली जात होती.[1] तसेच जनावरांच्या शेण व मुत्रचा वापर खत म्हणून केला जात असे. भात आणि ऊस ही प्रामुख्याने पिके घतली जात होती सेनखताचा उपयोग तंबाखु व इतर व्यापारी पिके घेण्यासाठी केला जात असे. कोल्हापूरच्या पश्चिमेकडील भागात शेतीमधीलच बुडखे, कवळ-काटक्या रोपे तयार करण्याच्या जागेमध्ये जाळत ; काटक्या जाळल्यानंतर जी राख पडते ती नांगरण करुन जमिनीत मिसळली जाई. तसेच ताग व तीळ शेतात

पेरुन त्यांना फुले येताच नांगरण करुन जमिनीत गाढले जाई. हे खत ऊसाला उत्तम प्रकारे मानवत असे.[3] करवीर संस्थानातील बहुतांश शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट होती. खाऊन-पिऊन सुखी असणारे शेतकरी फारच कमी होते.

2) शेती हा मुख्य व्यवसाय :-

करवीर संस्थानामधील लोकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय होता. करवीर राज्यातील सर्वात जास्त लोकांचा उदरनिर्वाह शेतीवरच चालत असे. शेतकऱ्यांना कुणबीदेखील म्हणत असे. कुणबी लोकांशिवाय जैन, लिंगायत, ब्राम्हण, मराठे , बेरड, रामोशी, मुसलमान, धनगर, कोळी, महार इ. असे सर्व जातीचे लोक शेती व्यवसाय करीत असे. शेतकरी वर्ग हा देव-देवतांवर विश्वास ठेवणारा, रुढी, परंपरा पाळणारा, धार्मिकवृत्तीचा होता. शेतातील कोणतीही महत्वाची कामे मुहूर्त पाहून करीत असे. शेतकरी जमीन नांगरण्यासाठी बैल व रेडयांचा उपयोग करीत असे. तसेच कुळव, कुरी, कोळपे, खुरपे, कुदळ खोरे, कुऱ्हाड इ. या अवजारांचा वापर शेतकरी शेती करण्यासाठी करीत असे. शेतातून जास्त उत्पादन काढण्यासाठी शेतकरी खतांचा वार करीत.[2] तसेच जनावरांच्या शेण व मुत्राचा वापर खत म्हणून केला हात असे. भात आणि ऊस ही प्रामुख्याने पिके घेतली जात होती. सेनखताचा उपयोग तंबाखू व इतर व्यापारी पिके घेण्यासाठी केला जात असे. कोल्हापूरच्या पश्चिमेकडील भागात शेतीमधीलच बुडखे, कवळ- काटक्या रोपे तयार करण्याच्या जागेमध्ये जाळत ; काटक्या जाळल्यानंतर जी राख पडते ती नांगरण करुन जमिनीत मिसळली जाई. तसेच ताग व तीळ शेतात पेरुन त्यांना फुले येताच नांगरण करुन जमिनीत गाढले जाई. हे खत ऊसाला उत्तम प्रकारे मानवत असे.[3] करवीर संस्थानातील बहुतांश शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट होती. खाऊन-पिऊन सुखी असणारे शेतकरी फारच कमी होते.

3) दुष्काळ :-

कोल्हापूर संस्थानात 1876-77, 1896-97 व 1899-1900 यावर्षी कोरडे दुष्काळ पडले. या दुष्काळात पाऊस न पडल्याने शेतकऱ्यांचे अतिशय वाईल हाल झाले.

सन 1896-97 व सन 1899-1900 या दुष्काळामध्ये गुरांच्या चारापाण्यासाठी छावण्या उभारल्या होत्या. दुष्काळ काळात कामे काढून लोकांना दिलासा दिला. शेतकऱ्यांना शेतसाऱ्यामध्ये सवलती दिल्या. शेतकऱ्यांना तगाई स्वरुपात कर्जे दिली. शेतकऱ्यांची या दुष्काळातून सुटका होताच त्यांच्या विकासासाठी कायमस्वरुपी उपाययोजना हाती घेऊन ' राधानगरी धरण ' बांधण्यांत आले.[4] शाहू महाराजांनी दरबारातर्फे ' दुष्काळ विभाग ' निर्माण केला.[5]

सन 1897 च्या दुष्काळामध्ये कळंबा तलावाची दुरुस्ती केली. सन 1897 मध्ये पेठवडगांव आणि अतिग्रे तेथे तलाव बांधण्यात आले. नवीन तलाव, रस्ते दुरुस्ती, दुष्काळी भत्ता, नवीन विहीरी बांधण्यांत आल्या. अशाप्रकारे दुष्काळावर मात करण्यासाठी करवीरच्या छत्रपतींनी अनेक उपाययोना केल्या.

4) जमिनीचे प्रकार :-

भारतामध्ये भौगोलिक परिस्थिती, समाजरचना, अर्थव्यवस्था यामुळे जमिनीचे प्रकार वेगवेगळे आहेत. जमिनीच्या बाबतीत सात-आठशे वर्षापूर्वी जे शिलालेख सापडलेले आहेत. यावरुन असे वाटते की, त्याकाळात सर्व जमिनीचा मालक ' राजा ' होता.

स्वत: राज्याच्या किंवा जहागीरदारांच्या सनदावरुन जमिनी लोकांकडे चालतात त्यांचे दोन प्रकार होतात. सनद पत्रावरुन जहागीर, सरंजाम, इनाम, वेतन इ, रुपांनी जमीन दिल्या जात त्यांना दुमाला जमीन म्हटले जात असे. तर काही नियमित फाळा देण्याच्या कराराने रयतांकडे जमिनी दिल्या जातात त्याला खालसा जमीन म्हटले जात होते. सैन्य किंवा पायदळ ठेवून सरकारची नोकरी करण्याबद्दल ज्या जमिनी दिल्या जात त्यांना सरंजाम किंवा जहागिरी म्हणत

असत.[7] ब्रिटीश राजवटीमध्ये 15 ते 30 वर्षाच्या कराराने काही ठराव करुन फाळयाने ज्या जकिनी रयतेस देत त्यांना मिराशी जमीन म्हटले जाई. थोडक्यात मिराशी म्हणजे कायम रयतावा होय.[8]

मराठेशाहीमध्ये राजाच्या खाजगी उपयोगकारिता काही जमीन असे त्याला ' शेरी जमीन ' म्हटले जाई. या जमिनीमध्ये फुलांच्या, फळांच्या बागा, भाजीपाला आणि इतर पिके घेतली जाई. या जमिनीवर सारा ठरलेला नसे या जमिनीमध्ये लागवड सरकारच्या इच्छेनुसार केली जात असे.[9] जी शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते तिला जिरायत शेती म्हणतात. कृत्रिमरित्या पाणी पुरवठा केल्या जाणाऱ्या जमिनीला ' बागायत शेती ' म्हटले जाते.

कोल्हापूर राज्यात कोठेही कालवे नव्हते. बागायती जमिनीसाठी ओढे, नद्या, तलाव , यांना मातीचे बांध घालून हिवाला व उन्हाळयामध्ये शेतीला पाणी पुरवठा केला जात असे व याद्वारे बागायती पिके घेतली जात असे. ओढे, नद्या, तलाव यांना बांध घालून पाटाद्वारे ज्या जमिनीला पाणी दिले जाई तिला पाटस्थळ जमीन म्हणत. कृष्णा, भोगावती, पंचगंगा, वारणा, हिरण्यकेशी, कुंभी आणि कासारी या नद्या कोल्हापूर प्रांतात होत्या. रंकाळा, पद्माळे, कळंबा या तळयाच्या पाण्याने कांही प्रमाणात जमीन पाण्याखाली आली होती.[10]

समारोप

अशाप्रकारे कोल्हापूरात जमिनीची विभागणी केलेली होती. यावरुन राज्यात पाणी व्यवस्थापन शेतीवरच अवलंबून होते. त्यामुळे तेथील सर्वसामान्य शेतकऱ्यांनी स्थिती मध्यम होती. सधन किंवा प्रगतीशील शेतकरी फारच कमी होते. गरीब शेतकरी पारंपरिक प्रथा, रुढीमुळे लग्न कार्यात मोठा खर्च करीत असे. त्यामुळे ते कायम कर्जबाजारी असत. त्यामुळे कोल्हापूर प्रांतातील शेतकऱ्याची स्थिती सुधारण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. पाणीपुरवठा व्यवस्थापन ; शेतकऱ्यांना कर्ज देणे, शेतीहीन शेतकऱ्यांना कामे देणे, शेतीची प्रत सुधारण इ. उपाययोजना करुन कृषिविषयक विकसीत धोरण अवलंबणे.

संदर्भ

1) मोडक बा.प्र., कोल्हापूर संस्थानचे गॅझेटियर, 1890, पृष्ठ 223-224.
2) मोडक बा.प्र., कोल्हापूर प्रांताचा इतिहास, 1877.
3) कोल्हापूर गॅझेटिअर, 1895, कोल्हापूर, करवीर सरकार, सन 1896 पृष्ठ 277
4) कुलकर्णी ब.शि., कुलकर्णी मीना, श्री शाहू छत्रपतींचे अर्थकरण, गौरी-नंदन प्रकाशन, कोल्हापूर, 1975 पृष्ठ 148
5) तत्रैव- 149
6) मोडक बा.प्र. कोल्हापूर आणि कर्नाटक प्रातांतील राज्ये व संस्थाने यांचा इतिहास पुवार्ध भाग, एक 1877, पृष्ठ 15
7) कित्ता, पृष्ठ 16
8) कित्ता, पृष्ठ 19
9) कित्ता, पृष्ठ 22
10) मोडक बा.प्र. कोल्हापूर संस्थानचे गॅझेटियर, मुंबई इलाख्याचे गॅझेटियर, पुस्तक नं. 24, 1890 पृष्ठ 233